
# ऑक्टोबर, २०२४ चे राशी भविष्य- अश्विन महिना- शुक्ल व कृष्ण पक्ष


**लेखक - अजय तनखीवाले**



**पार्श्वभूमी :**
२ ऑक्टोबरचे सूर्यग्रहण हे भाद्रपदात होते. या महिन्यात, नऊ ऑक्टोबर पासून गुरु वक्री होणार. प्लूटो अकरा ऑक्टोबर पासून मार्गी होणार. शनि, हर्षल व नेपच्युन वक्री आहेत. ते वर्चस्व दाखवणार.
**उत्सव:** अश्विन मासात नवरात्री, शारदोत्सव, दुर्गा पूजा व कोजागिरी पौर्णिमा हे उत्सव होतील. महिन्याअखेर दिवाळी सुरू होणार.
**महत्वाच्या तारखा:** अमावस्या- २ ऑक्टोबर, पौर्णिमा– १६ ऑक्टोबर.



२.०: महिन्यातील गोचर ग्रह व युती: १. मकरेत प्लुटो, २. कुंभेत शनि, ३. रवि, केतु , बुध कन्येत, ४. शुक्र तुळ राशीत, ५. गुरु, हर्षल वृषभेत, ६. राहु, नेपच्यून मिनेत आहेत.


**१.२ – २ ऑक्टोबर रोजी ची कुंडली व १६ ऑक्टोबर ची कुंडली**

| **२ ऑक्टोबर ची कुंडली** | **१६ ऑक्टोबर ची कुंडली** | **वक्री ग्रह** |
|---|---|---|
|   |   | शनि-वक्री,<br>गुरु- वक्री,<br>हर्षल- वक्री,<br>नेपच्यून वक्री,<br>प्लूटो- मार्गी |

**२.०: भविष्य-चंद्र राशी प्रमाणे: (भारतीय पध्दती प्रमाणे वाचावे).**

काही लोकांना नक्षत्र माहित असते. दक्षिण भारतात त्यास स्टार म्हणतात. चंद्र राशी बरोबर नक्षत्र आणि चरण दिले आहे. तर राशी आणि नक्षत्र या पैकी जे माहिती असेल तो भाग वाचावा.


| राशी | भविष्य |
|---|---|
| २. १ मेष राशी (Mesh):<br><br><br>अश्विनी, भरणी, कृत्तिका(१) | ● *<u>शनि -११वा, गुरु -२रा, राहू -१२वा (अनिष्ठ)</u>*<br>● *<u>अ. स्वास्थ्य</u>*<br>    ● स्वास्थ हळूहळू सुधारेल. उत्तरार्ध थोडा त्रासदायक असण्याची शक्यता आहे.<br>● *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>    ● व्यवसायिक समारंभातून भरपूर लाभ प्राप्त होईल.<br>    ● महिन्याअखेर मानसन्मान होतील.<br>● *<u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>    ● तरुणांना विवाह संबंधित स्थळे सांगून येतील. साथीदार खूप रोमँटिक होईल आणि जीवन रसमय करेल.<br>● *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>    ● वास्तु विषयक व्यवहार होतील. घरची मालमत्ता संपत्ती जपून ठेवा. गुंतवणुका उत्तम होतील. शेती जमीन इत्यादी खरेदी करायला दलाल प्रोत्साहन देतील. पण थोडं जपूनच.<br>● *<u>इ . कौटुंबिक</u>*<br>    ● कायदेशीर प्रश्न सुटतील. भावंडात थोडे वैमनस्य वाढेल.<br>    ● मुलांचं उत्तम चालेल.<br>● *<u>फ . परदेश गमन</u>*<br>    ● अमावस्येला कलह होण्याची शक्यता आहे. |
| २.२ वृषभराशी (Vrishabha):<br><br><br>कृत्तिका(२,३,४), रोहिणी, मृग (१,२) | ● *<u>शनि -१० वा गुरु -१ला , राहू -११वा</u>*<br>● *<u>अ. स्वास्थ्य</u>*<br>    ● या मासात स्वास्थ उत्तम असेल. थोडीशी कुरबुर सोडल्यास स्त्रियांना सुद्धा स्वास्थ्य उत्तमच लाभेल.<br>● *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>    ● या महिन्यात उत्कर्ष होईल. तरुणांची शिक्षणात उत्तम प्रगती होईल. धंद्यात चांगली वृद्धि होईल. तेजीत भरपूर पैसे कमवाल.<br>● *<u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>    ● प्रवासात वेंधळेपणा होऊ नये याची काळजी घ्या. उत्तरार्धात वैवाहिक जीवन भाग्योदयाचा.<br>● *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>    ● व्यवसायिक शत्रुत्व मात्र त्रासदायक होईल. मध्यस्थी मधून लाभ होईल. अनपेक्षित नुकसान होण्याची शक्यता आहे.<br>    ● शेत जमीन खरेदी विक्री दलालाशी संबंध येईल.<br>● *<u>इ . कौटुंबिक</u>*<br>    ● परीक्षांमध्ये मुलं उत्तम कामगिरी करतील. |

| | |
|---|---|
| | ● तरीसुद्धा थोडासा अपेक्षाभंग होण्याची शक्यता आहे.<br>● *फ . परदेशगमन*<br>  ● सल्लागार म्हणून परदेशी जाल. |
| २.3 मिथुन राशी (Mithun):<br><br><br>मृग(३,४), आर्द्रा, पुनर्वसु(१,२,३) | ● *शनि -९वा, गुरु -१२वा (अनिष्ठ), राहू – १०वा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>  ● दुखापती पासून जपा. कापणे भाजणे पासून सांभाळा.<br>  ● पथ्य पाणी सांभाळून मजा करा.<br>● *ब . नोकरी/धंदा*<br>  ● उत्तरार्धात प्रलोभने टाळा. आर्थिक व्यवहार सांभाळून करा.<br>  ● अंधारात टोले मारू नका.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● थोडक्यात थोडक्यात वादविवाद वाढवून नका.<br>  ● अगदीच नातं तुटे पर्यंत नेण्याची गरज नाही.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● बुध शुक्र साथ देतील. घरात कार्य संबंधाने उंचीची खरेदी होईल.  वास्तु प्रवेश कराल.<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● होणारी कार्य ठरतील. अमावस्या जवळ खर्चाचे प्रसंग येतील.<br>  ● आईची आणि वडिलांची तब्येत बघून काळजी वाटेल.<br>  ● मुली कलाक्षेत्रात खूपच उत्तम कामगिरी करून दाखवतील.<br>● *फ . परदेश गमन*<br>  o घाऊक व्यापारी किंवा कारखानदार म्हणून परदेशी खेपा घालाल. |
| २.४ कर्क राशी (Karka):<br><br><br>पुनर्वसु(४), पुष्य, आश्लेषा | ● *शनि – ८वा(अनिष्ठ), गुरु-११वा, राहू-९वा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>  ● शनि मंगळाचे तब्येतीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.<br>● *ब . नोकरी/धंदा*<br>  ● वैयक्तिक उपक्रमांना ग्रहांची साथ आहे. पौर्णिमेपर्यंत महत्त्वाची कामे उरकतील.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● तरुणांना उत्तरार्ध सर्व बाबतीत अनुकूल आहे.<br>  ● प्रेमविवाह संपन्न होतील.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● गुरु भ्रमणाचा उत्तम लाभ घ्याल. परदेशातून आलेल्या सर्व कंत्राट्यांना नीट न्याहाळून बघा. त्यात थोडी फसवेगिरी होण्याची शक्यता आहे.<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● अमावस्येजवळ वाद टाळा. भावंडांमध्ये फारशे सख्य नसणार. मुख्य मुद्दे पुढच्या महिन्यापर्यंत ढकला.<br>  ● आईची तब्येत छानच असणार. मुलींच्या कलांना प्रोत्साहन द्या त्या फार सुंदर कला प्रदर्शित करू शकतात. |

| | |
|---|---|
| | ● *फ . परदेश गमन*<br>  ● परदेश गमन नक्कीच होईल. |
| २. ५ सिंहराशी (Simha):<br><br><br>मघा, पूर्वा, उत्तरा(१) | ● *शनि – ७ वा, गुरु - १० वा , राहू – ८ वा (अनिष्ठ)*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>  ● या महिन्यात तब्येत उत्तम असेल पण जुन्या व्याधी मात्र त्रास देते.<br>● *ब . नोकरी/धंदा*<br>  ● पूर्वार्धात शुभ ग्रह व्यावहारिक साथ देतील. सरकारी माध्यमातून लाभ होईल. पौर्णिमेत घवघवीत यश मिळेल.<br>  ● सल्लागार म्हणून प्रसिद्ध व्हाल. आधुनिक तंत्रज्ञानात प्रगती कराल.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● शनि भ्रमणाचे त्रास नोव्हेंबर १५ पर्यंतच आहेत त्यामुळे फार मानसिक त्रास करून घेऊ नये.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● मंगळ भ्रमण थोडी पैशांची नासधूस करतो. ग्रहणातला रवि सुद्धा थोडी नुकसानी घडवतो.<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● गर्भवतींनी या काळात सांभाळावे. उत्तरार्धात घरात मोठ्या सुवर्ता येतील. बहिणीशी उत्तम जमवून  घ्याल.<br>● *फ . परदेश गमन*<br>  ●  परदेशस्थ तरुण आपल्या क्षेत्रात भाग्योदय पावतील.<br>  o याबाबतीत जुगार मात्र टाळावा. |
| २. ६ कन्या राशी (Kanya):<br><br><br>उत्तरा(२,३,४), हस्त, चित्रा (१,२) | ● *शनि – ६ वा (अनिष्ठ) , गुरु -९ वा , राहू -७ वा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>  ● जुन्या व्याधी थोडे दिवस अजून सहन कराव्या लागतील. पण पुढच्याच महिन्यापासून थोडे शांत व्हाल. गेल्या महिन्यात  खालावली तब्येत हळूहळू पूर्ववत व्हायला लागेल.<br>● *ब . नोकरी/धंदा*<br>  ●  शुभ ग्रह भरपूर साथ देतील. तरुणांना त्याचा लाभ मिळेल.  मान सन्मानाचे योग येतील. तुमचा धाडसीपणा कामावर उपयोगी पडेल.<br>● *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● साथीदाराशी फार ताणून धरू नका. आपल्या मनाच्या इन्स्टिंक्ट वापरून बुद्धिचातुर्याने  गुंता सोडवा.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● उत्तरार्धात मोठे व्यवसायिक धनलाभ घडतील.<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● पौर्णिमेजवळ सामाजिक जीवन सांभाळावे. अमावस्येच्या जवळ भावाची चिंता वाटेल.<br>● *फ . परदेश गमन*<br>  o सल्लागार किंवा शिक्षक म्हणून परदेशी गमनाची बरीचशी शक्यता आहे. |

| | |
|---|---|
| २.७ तूळ राशी (Tula):<br><br><br>चित्रा(३,४), स्वाती, विशाखा (१,२,३) | • *शनि ५, वा, गुरु ८ वा(अनिष्ठ) , राहू-६ वा (अनिष्ठ)*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  • पौर्णिमे जवळ आरोग्य विषयक पथ्य पाळा. काही व्याधीतून हळूहळू बाहेर पडाल. अनपेक्षितपणे जुने रोग डोकं वर काढतील पण त्यावर तुम्ही आपल्या बुद्धीच्या तुर्याने उपाय शोधून काढाल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  • पूर्वार्धात परिस्थितीजन्य लाभ होतील. मात्र कायदेशीर बाब सांभाळावी. नोकरीत वरिष्ठांशी नमत घ्या.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • अमावस्येत तरुणांना कुसंगती घातक ठरेल. घरी साथीदाराचे प्रेम उतू जाईल. थोडासा बालिशपणा सुद्धा अनुभवात.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  • उत्तरार्धात व्यावसायिक तेजी अनुभवाल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  • मुलं मात्र गणित सारख्या क्लिष्ट विषयांमध्ये उत्तम प्रकारे उत्तीर्ण होतील आईची तब्येत सांभाळून.<br>• *फ . परदेश गमन*<br>  o परदेशातून आलेल्या कॉन्ट्रॅक्ट्सला उतावीळपणे सह्या करू नका, नीट पडताळून बघितल्याशिवाय मंजूर करू नका. |
| २. ८ वृश्चिक राशी (Vrishchika):<br><br><br>विशाखा(४), अनुराधा, ज्येष्ठा | • *शनि – ४ वा, गुरु -७ वा , राहू -५ वा*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  • छान ग्रह संगतीचा महिना आहे.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>  • तरुणांना मुलाखतीतून यश मिळेल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  • उत्तरार्ध अनेक गोष्टीतून चमत्कार घडवेल.<br>  • साथीदाराचा फारच प्रेमळ स्वभाव तुम्हाला शांत करेल.<br>  • साथीदार चक्क गुरु म्हणून तुम्हाला ज्ञान वाटेल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  • कलाकारांना हा महिना झगमगाटाचा जाईल. वडिलोपार्जित घरात थोडीशी सुधारणा कराल. झालेले नुकसान थोडे भरून निघेल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>  • पुत्र चिंता जाईल. गुरु भ्रमण उत्तम साथ देईल.<br>• *फ . परदेश गमन*<br>  o पौर्णिमेजवळ महागाच्या चीज वस्तू जपा. |
| २. ९ धनू राशी(Dhanu): | • *शनि – ३ रा , गुरु -,६वा (अनिष्ठ), राहू -४था*<br>• *अ. स्वास्थ्य*<br>  • मंगळ भ्रमणामुळे कठीण होईल.<br>• *ब . नोकरी/धंदा* |

| | |
|---|---|
|  <br>मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा(१) | ● व्यावसायिक संधीचा लाभ उठवाल. पौर्णिमे जवळ नोकरीत उत्तम घडामोडी घडतील.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● शुक्र मात्र खेळीमेळीने लोकांशी जमवून घेईल.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● उत्तरार्धात विचित्र खर्च येतील.<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● भाऊ बहिणींची एकी बाहेरच्यांना सहज कळेल.<br>● *फ . परदेश गमन*<br>  o नोकरीतून परदेशगमन होण्याची शक्यता आहे. |
| २. १० मकर राशी (Makar):<br> <br>उत्तराषाढा(२,३,४), श्रवण, धनिष्ठा(१,२) | ● *शनि -२ रा, गुरु –५ वा, राहु -३ रा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>  ● बारीक-सारीक ताप, भाजण, कापण सोडलं तर या महिन्यात तब्येत फारच चांगली असायला हवी.<br>● *ब . नोकरी/धंदा*<br>  ● शुक्र भ्रमणाने मित्र-मैत्रिणींची उत्तम नेटवर्किंग होईल.<br>  ● नोकरीत एक सुंदर पर्व सुरू होईल.<br>  ● कंपनी ऐश्वर्य आयुष्य आरामाची असावी आणि छान एअर कंडिशन रूममध्ये तुम्ही काम कराल.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ● घरगुती वाद टाळा.<br>  ● तेवढं सोडलं तर हा महिना उत्तमच जाईल.<br>● *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>  ● अमावस्या एकूण राजकारणातून त्रासाची ठरेल.<br>  ● गुरु शनि भ्रमणामुळे गुंतवणुकी उत्तम होतील.<br>● *इ . कौटुंबिक*<br>  ● उत्तरार्ध एकंदरीत शुभ असणार. स्पर्धात्मक यश मिळेल.<br>  ● भावंडात पुढाकार घ्या आणि गैरसमज दूर करा.<br>● *फ . परदेश गमन*<br>  o परदेश गमनास उत्तम योग आहेत. |
| २. ११ कुंभ राशी (Kumbha):<br> <br>धनिष्ठा(३,४), शततारका, पूर्वाभाद्रपदा (१,२,३) | ● *शनि – १ ला, गुरु – ४ था , राहू – २ रा*<br>● *अ. स्वास्थ्य*<br>  ● शनि ग्रहाची कृपा आणि तब्येत उत्तम राहील.<br>  ● उत्तरार्धात त्रास कमी होईल.<br>● *ब . नोकरी/धंदा*<br>  ● व्यावसायिक तेजी येईल. सरकारी माध्यमातून लाभ मिळेल.<br>  ● तरुणांना उत्तरार्धात छान नोकरी मिळेल.<br>  ● सल्लागार म्हणून उत्तम संधी मिळणार.<br>● *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे* |

| | |
|---|---|
| | ● शुक्राचे भ्रमण पूर्वार्धात उत्तम योग जुळवून आणतील.<br>● तरुणांनी अवश्य लाभ घ्यावा.<br>● *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>● पौर्णिमे जवळ वैयक्तिक उपक्रमातून झगमगाट होईल.<br>● *<u>इ . कौटुंबिक</u>*<br>● अमावस्येला मातृ पितृ चिंता होईल.<br>● मुलं मैदानी खेळत उत्तम प्रगती करतील.<br>● *<u>फ . परदेश गमन</u>*<br>o या काळात परदेशातली सगळी चैन घरीच मिळेल.<br>o एजंट बोलवून घेतील. |
| २.१२ मीन राशी (Meena): पूर्वाभाद्रपदा (४), उत्तराभाद्रपदा, रेवती<br><br> | ● *<u>अ. शनि – १२ (अनिष्ठ),, वा, गुरु - ३ रा , राहू -१ ला</u>*<br>● *<u>अ. स्वास्थ्य</u>*<br>● मंगळ भ्रमणाचा उच्च दबाव असेल. गृहिणीनी भाजणं कापणं सांभाळावं.<br>● जुन्या व्याधी मात्र थोड्या त्रासदायक ठरतील.<br>● *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>● आपल्या धाडसीपणाने तुम्ही कंपनीत पुढे जाल.<br>● *<u>क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>● घरात वाद टाळा.<br>● संशय कल्लोळ कमी करायचा.<br>● *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>● उत्तरार्ध शुक्र ग्रहाच्या कृपेने नशीब उत्तम साथ देईल.<br>● अमावस्येजवळ पाकीट सांभाळावे.<br>● *<u>इ . कौटुंबिक</u>*<br>● आईची तब्येत थोडी वर खाली होईल.<br>● *<u>फ . परदेश गमन</u>*<br>o उत्तरार्धात संधी मिळेल. |